**पीएच.डी सारांश**

**आचार्य विनोबा भावे यांचे तत्वज्ञान आणि त्यांचा नव्या शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात शिक्षणावर परिणाम- एक अभ्यास**

**डॉ. ए सी भारोटे**

**(१) संशोधनाची उद्दिष्टे -**

(१) आचार्य विनोबा भावे यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे अध्ययन करणे.

(२) १९८६ च्या नव्या शैक्षणिक धोरणाचे त्यातील तपशीलासह अध्ययन करणे.

(३) नवे शैक्षणिक धोरण आणि विनोबांचे तत्वज्ञान यातील साधारण दुव्यांचा शोध घेणे.

(४) नव्या धोरणाच्या संदर्भात विनोबांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा शिक्षणावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.

**(२) संशोधन पध्दती व साधने**

१) ऐतिहासिक पध्दती

२) वर्णनात्मक पध्दती

३) आशय विश्लेषण पध्दती

**(३) माहिती संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन**

१) विनोबा जीवन दर्श (१९८४)

२) विनोबा शिक्षण विचार (१९७७)

३) स्वामी विवेकानंद ते आचार्य विनोबा (१९७८)

४) राष्ट्रीय शैक्षणीक धोरण १९८६

५) आचार्य विनोबा भावे यांचेशी संबंधीत विविध लेख, पत्रे, परीक्षणे, टिपणे व इतर संबंधीत कागदपत्रे

६) कोठारी आयोगाचा अहवाल १९६६

७) भारतीय शिक्षणातील आधुनीक विचार प्रवाह १९९१

**(४) संशोधन सारांश, निष्कर्ष**

१) शिक्षण प्रणाली ताबडतोब बदलायला हवी असे विनोबांनी सांगीतले.

२) शिक्षणाला नवी दिशा देण्यासाठी शिक्षणात बदल हवा हे शासनाने जनमत जाणून घेतल्यानंतर मान्य केले.

३) नव्या सामाजिक गरजा, नवी आव्हाने, नवे तणाव हयांना सामोरे जाण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण आवश्यक आहे असे मान्य झाल्यानंतरच नवीन धोरणाची आखणी करण्यात आली.

४) शिक्षण हा आपल्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. ती आजची आणि उद्याची गुंतवणुक आहे हे नव्या धोरणात मान्य झाले आहे.

५) राष्ट्रीय शिक्षण पध्दतीचा अवलंब नव्या धोरणात मान्य करण्यात आला आहे. भारताचा सांस्कृतीक वारसा, लोकशाही, सर्वधर्म समभाव, वातावरण शुध्द राखणे, सामाजिक कुंपणे तोडणे, छोटया परिवारांच्या आदर्शाचे पालन इ विनोबांच्या चिंतनातील गोष्टींचा अंतर्भाव नव्या धोरणात करण्यात आला आहे.

६) विनोबांनी जय जगत चा नारा दिला. जय जगतपेक्षा कमी आता चालायचे नाही असे त्यांनी सांगीतले. हाच विचार नव्या धोरणात मान्य करुन आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांततामय सहजीवन यांना महत्व देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी विद्यार्थ्यांची मनोधारणा निर्माण करणे हे तर नव्या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

७) विनोबांनी नेहमी समानतेवर भर दिला आहे. त्यांनी शिक्षणात स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत हा भेद गौण मानला आहे. हीच गोष्ट नव्या शैक्षणिक धोरणात दिसून येते.

८) विनोबांच्या शैक्षणिक तत्वज्ञानात निरंतर शिक्षणाची संकल्पना अंतर्भुत आहे. हे शिक्षण जन्मभर चालावयाचे व जन्मापूर्वी गर्भावस्थेपासूनच सुरु व्हावयाचे असे विनोबा मानतात. विनोबांच्या हया तत्वज्ञानाचा प्रभाव निश्चितपणे नव्या धोरणावर पडलेला आहे असे दिसून येते. निरंतर शिक्षणावर भर हेही नव्या धोरणाचे वैशिष्टय आहे.

आर सी पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर

९) विनोबांना शिक्षणासाठी शासनांची मदत हवी आहे. कारण त्यांच्या मते ते शासनाचे कर्तव्यच आहे. परंतू त्यांना शासनाचा अंकूश नको. नव्या धोरणातील शिक्षणावरील शासकीय खर्च आणखी वाढला आहे.

१०) प्रौढांचे शिक्षण उद्योगाच्या द्वारे झाले पाहिजे असे विनोबा मानतात. बुनियादी शिक्षण हाती घेतले म्हणजे प्रौढ शिक्षण आपोआप होईल असे त्यांचे म्हणणे आहे. नव्या धोरणात विनोबांच्या हया चिंतनाचा प्रभाव जाणवतो. साक्षरतेबरोबरच काम करण्याचे ज्ञान व कौशल्य शिकणाऱ्यात यावे अशी नव्या धोरणाची अपेक्षा आहे.

११) प्राथमीक शिक्षणाचा विचार करतांना विनोबा म्हणतात- मुलांना त्यांच्या गरजेप्रमाणे ज्ञान द्यावे. नवे धोरण सुध्दा या विचारांचा स्वीकार करते आणि विद्यार्थ्यांच्या गरजा व स्थानिक वातावरण पायाभूत मानते.

१२) विनोबांच्या शिक्षण योजनेत उद्योग शिक्षणाला सर्वाधीक महत्व आहे. शेती हा त्यांनी महत्वाचा उद्योग मानला आहे. शेतात काम करो जे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकाला अनिवार्य समजतात. नव्या धोरणातील माध्यमिक शिक्षण सुध्दा व्यावसायिक शिक्षणावर भर देते. नव्या धोरणात विनोबांच्या श्रम प्रतिष्ठेला प्राधान्य दिले गेले आहे.

१३) उच्च शिक्षणात विनोबांना पूर्ण स्वातंत्र्य हवे आहे. विनोबांच्या हया चिंतनाला अनुसरुन स्वायत्त महाविद्यालये व स्वायत्त विद्यापीठे नव्या धोरणात मोठया प्रमाणावर अपेक्षित आहेत.

१४) नव्या योजनेतील ग्रामीण विद्यापीठे ही गांधी विनोबा हयांच्या तत्वज्ञानांच्या महत्वपूर्ण आणि जबरदस्त प्रभाव दाखविणाऱ्या संस्था आहेत. महात्मा गांधी प्रणित जीवनशिक्षण संस्थाना व कार्यक्रमांना नव्या योजनेतून मिळणारे सहाय्य विनोबांच्या तत्वज्ञानाचा उच्च शिक्षणावर स्पष्ट प्रभाव दर्शविते.

१५) नवोदय विद्यालयांची स्थापना नव्या शैक्षणिक धोरणाची नाविन्यता व्यक्त करते. विनोबांना शाळा नेहमी ग्रामीण भागातच हव्या होत्या. या विशेष शाळा ग्रामीण भागातच उघडल्या जात आहेत. विनोबांच्या ग्रामीण शिक्षण विषयक चिंतनाचा हा मौलिक प्रभाव आहे असे दिसते.

१६) विनोबांनी आधुनिक विज्ञानाच्या अध्ययनाला महत्वपूर्ण मानले आहे. विज्ञानाशिवाय जगात कोणतेही काम होऊ शकणार नाही असे ते मानतात. विज्ञान व अहिंसा यांची युती झाली तरी पृथ्वी वर स्वर्ग उतरेल असे विनोबांना वाटते. नव्या धोरणाने विज्ञान व तंत्रज्ञान विषयक शिक्षणाला प्रोत्साहन मिळणार आहे. विज्ञान शिक्षणाच्या विकासाकरीता विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

१७) विनोबांचा शिक्षक अनुभव संपन्न व तेजस्वी मन, बुध्दी व शरीर असलेली, शरीरश्रम करणारा आहे. नव्या शैक्षणिक धोरणाने शिक्षकांवर पूर्ण विश्वास टाकलेला आहे. शिक्षकांची व्यावसायीक पात्रता वाढावी यासाठी विनोब विविध उद्बोधन वर्गांची आवश्यकता व्यक्त करतात.ही गोष्ट नव्या धोरणात अंतर्भूत करण्यात आली आहे. शिक्षक प्रशिक्षण संस्थाना दर्जेदार बनविण्याचे प्रयत्न नवीन धोरणात आहेत.

१८) विनोबांनी अध्यापनाची जबाबदारी स्त्रीयांवर टाकलेली आहे. नव्या धोरणाने ही बाब स्वीकारुन स्त्रियांना शिक्षणाच्या नियोजनात व व्यवस्थापनात सहभागी केले आहे. त्यांच्यासाठी विशेष सहाय्य सेवा पुरविली आहे. स्त्रियामध्ये त्यांच्या अधिकाराची जाणीव निर्माण व्हावी असे नवे शैक्षणिक धोरण आग्रहाने सांगते.

१९) प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम देशभर सक्तीचा करावा हे विनोबाचे चिंतन नव्या धोरणात अनुस्थूत आहे. त्यासाठी शिक्षक, विद्यार्थी, तरुण सेवाभावी संस्था व नोकऱ्या देणारे मालक यांचा सहभाग नव्या धोरणाने अपेक्षिला आहे.

२०) विनोबाची उद्योगप्रधान शिक्षणाचे तत्वज्ञान नव्या धोरणाला स्वागतार्ह आहे असे दिसते. व्यावसायीक शिक्षक हा नव्या धोरणातील एक स्वतंत्र व्यवच्छेदक प्रवाह आहे.

२१) देशाला २१ व्या शतकासाठी सज्ज करणारे शिक्षण मिळावे या दृष्टीने नवे शैक्षणिक धोरण १९८६ अंमलात येत आहे. याशिवाय अनेक प्रकारची नवी आव्हाने आणि सामाजिक गरजा निर्माण झाल्याने देशासाठी नवे धोरण आखावे लागले आहे. अर्थात विनोबांच्या तत्वज्ञानातील सर्वधर्मसमभाव, समाजवाद, लोकशाही आदि मुल्यांची त्यात जोपासना व जपणूक केलेली आहे. यातूनही विनोबांच्या तत्वज्ञानाचा नव्या धोरणाच्या संदर्भातील शिक्षणावरचा प्रभाव स्पष्ट होतो.